**प्रेस नोट** **०२/०४/२०२६**

**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०४, मुंबई**

**काळाचौकी पोलीस ठाणे**

**मंदीरातील सोन्याचे दागिने व डायमंडचा हिरा असे १ कोटी ७५ लाख रुपये मुद्देमाल चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास ४८ तासात अटक करून १०० % मुददेमाल हस्तगत करुन गुन्हा उघड केले बाबत.**

थोडक्यात हकीकत - दिनांक ३०/०३/२०२६ रोजी ०२.३० ते ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी यांच्या सोसायटी आवारातील जैन मंदिर येथे कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने मंदिरातून चोरी केली म्हणून अज्ञात इसमाविरोधात कायदेशीर तक्रार दिल्याने दिनांक ३०/०३/२०२६ रोजी गु.र.क्र व कलम- १२४/२०२६, कलम ३०५(D) ३३१ (४) BNS अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तपासा दरम्यान गुन्हयाचे घटनास्थळ व मुंबई हद्दीतील एकूण २०० ते ३०० सीसीटीव्ही कॅमेराची पाहणी केली असता, आरोपीत हा मंदिरामध्ये यापुर्वी सुरक्षा रक्षक म्हणून काम करत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यावरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे तांत्रिक विश्लेषण केले असता, आरोपी हा मध्य प्रदेश येथे गेल्याचे समजले.

आरोपीत हा त्याच्या गावातील नातेवाईकाच्या घराच्या छतावर लपून बसल्याची खबर मिळाली. त्याचा शोध सुरु असताना आरोपी घराच्या छतावरून दुस-या घराच्या छतावर उडी मारून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्यास पथकाने ताब्यात घेतले. आरोपीकडे नमूद गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली. आरोपी सोबत त्याने चोरी केलेला <u>१०० %</u> मुद्देमाल ताब्यात घेण्यात आले. आरोपीतावर मध्यप्रदेश राज्यामध्ये यापूर्वी आर्म अॅक्ट तसेच इतर लूटमारीचे असे एकूण १७ गुन्हे दाखल आहेत.

अटक आरोपी - जितेंद्र उर्फ जितन उर्फ बंटी उर्फ पंडित नगाईच, वय- ३४ वर्ष, जिल्हा भिंड, राज्य मध्य प्रदेश.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) श्री. सत्यनारायण चौधरी, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री लखमी गौतम, मा. अप्पर पोलीस आयुक्त (मध्य प्रादेशिक विभाग) श्री. विक्रम देशमाने, मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ४) श्रीमती. रागसुधा आर., पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. राजतिलक रोशन, सहा पोलिस उप आयुक्त (भोईवाडा विभाग) घनश्याम पलंगे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक (काळाचौकी पो ठाणे ) विजयकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अमित भोसले, सपोनि हसन मुलानी, सपोनि गोविंद खैरे ( RAK MARG PS), सपोनि प्रताप बंडगर (प्रॉपर्टी सेल) व पथक, सपोनि श्यामसुंदर भिसे, (क्राईम युनिट ०४) व पथक, पोउपनि राजेंद्र चव्हाण, पोउपनि धनंजय व्यवहारे, पोउपनि शीतल माने, पोउपनि सागर बनकर, पोउपनि ऋषिकेश कर्नर, पोशि लक्ष्मण खांडेकर, पोशि विजय सोनवणे, पोशि गोपाल चव्हाण, पोशि प्रशांत पवार, मपोशि तेजस्विनी गवारी, पोशि कुंभार, पो शि संकेत नायकवडी, पो हा अमर चन्ने, पोशि गणेश कोळेकर, पोशि पंकज आग्रे, पोहवा गोविंद ठोके (तांत्रिक मदत ) यांनी यशस्वीपणे पुर्ण केली आहे.

***